**नवी मुंबई महानगरपालिका**
**शिक्षण विभाग**

**विषय : निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शिकवणी तत्वावर (तासिका तत्वावर) प्राथमिक विभागाकरीता थेट मुलाखतीने (Walk in Selection) शिक्षक नियुक्ती.**

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष 2023- 2024 करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात शिकवणी तत्वावर (तासिका तत्वावर) प्राथमिक विभागाकरीता सहाय्यक शिक्षकांची आवश्यकता आहे. त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारकांकडून समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

**प्राथमिक विभाग :-**

| माध्यम | | | एकूण |
|---|---|---|---|
| मराठी | हिंदी | ऊर्दू | |
| ८८ | ३१ | ४ | १२३ |

**अटी / शर्ती :-**

१) अर्हता :- एच.एस.सी. – डी.एड+MAHA TET किंवा CTET

२) वयोमर्यादा :- खुला -३८ वर्षे पर्यंत, मागासवर्गीयासाठी – ४३ वर्षे पर्यंत.

३) निवडीसाठी कार्यपध्दती :- CTET किंवा MAHA TET परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे एकत्रित गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. CTET किंवा MAHA TET उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध न झाल्यास एच.एस.सी. डी.एड च्या उमेदवारांची निवड करण्यात येईल. संगणकाची MS CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे छाननीच्या वेळी मूळ गुणपत्रिका व मुळ प्रमाणपत्रे तपासण्यात येतील व कागदपत्राच्या सत्य प्रती सादर कराव्यात. छाननीच्या वेळी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. छाननीनंतर निकाल www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

४) सदर पदाची निवड (सहाय्यक शिक्षक) ही पुर्णपणे तासिका तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची आहे. उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार सांगता येणार नाही. सदरची नेमणूक शैक्षणिक वर्ष 2023 2024 याकरिता आवश्यकतेनुसार राहील.

५) तासिका तत्वावरील शिक्षकांची नेमणुक ही शैक्षणिक वर्ष 2023-2024 याकरिता (जुलै **२०२३** ते एप्रिल **२०२४** करिता) राहील. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करावे लागेल.

६) **प्राथमिक शिक्षकाकरीता तासिका तत्वावरील मानधन प्रती तास रु.१२५/- याप्रमाणे प्रती दिन घडयाळी ६ तासिकांचे कमाल शुल्क रु.७५०/- एवढे राहील. जेवढे तास सेवा दिली जाईल तेवढयाच तासाचे मानधन देय राहील.**

७) ज्या दिवशी सदर सहायक शिक्षकांची प्राथमिक/माध्यमिक शिक्षण विभागाला आवश्यकता नसेल. त्या दिवशी कोणतीही सूचना न देता सदर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त,नमुंमपा यांना राखून ठेवले आहेत.

८) शिक्षण विभागाला आवश्यकतेनुसार शिक्षकांची संख्या कमी/वाढविण्याचे अधिकार असतील.

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

९) अर्जदाराने महानगरपालिकेच्या जाहिरातीत विहित नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक असेल.

सदर अर्ज मा.उप आयुक्त (शिक्षण), नमुंमपा यांच्या नावाने करावा. **अर्ज करावयाचा अंतिम दि.१०/०७/२०२३ राहील. थेट मुलाखतीसाठी नवी मुंबई महानगरपालिका , मुख्यालय, तिसरा माळा, ज्ञानकेंद्र ,सी.बी.डी.बेलापूर येथे सकाळी १०:०० ते ०५:०० या वेळेत उपस्थित रहावे.** अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी सर्व मूळ कागदपत्रे नसतील अथवा विहित नमुन्यात अर्ज नसेल तर आपला अर्ज बाद करण्यात येईल, तसेच संध्याकाळी ०५:०० नंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत

१०) पोस्ट, कुरिअर किंवा ई-मेलद्वारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

११) निवडलेल्या उमेदवाराला तासिका तत्वावरील मानधना व्यतिरिक्त कोणत्याही सोई-सुविधा ,हक्क,नोकरी विषयक हक्क,व इतर आर्थिक लाभ दिले जाणार नाहीत. (उदा. दिवाळी बोनस आणि सानुग्रह अनुदान)

१२) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर, अर्जदार विहित नमुन्यातील अर्ज/शैक्षणिक पात्रता धारण न करणारे, तसेच नेमणूकी संदर्भात दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारी अथवा निवड कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

१३) अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१४) अपूर्ण अर्ज, अर्धवट कागदपत्रे जोडलेल्या तसेच जाहिरातीनुसार नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण न केलेल्या उमेदवारांचे अर्ज बाद करुन अपात्र ठरवले जातील. याबाबत या कार्यालयाकडून कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५) जाहिराती मधील विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारले जातील.

१६) उर्दू माध्यमाच्या सहाय्यक शिक्षकांना महापालिकेच्या कोणत्याही उर्दू शाळेत कामकाज करावे लागेल तसेच B.A.B.Ed. उर्दू शिक्षकांना सर्व विषयांचे अध्यापनाचे काम करावे लागेल.

१७) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करुन) महापालिका सेवेत भविष्यात नोकरीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१८) कोणत्याही कारणास्तव कोणत्याही वेळी नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, नमुंमपा यांना राहतील.

१९) उमेदवाराची निवड ही गुणवत्तेच्या आधारे मेरीटनुसार केली जाईल.

सही/-
(राजेश नार्वेकर)
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

फोटो

**प्रति,**
मा. उप आयुक्त (शिक्षण)
शिक्षण विभाग
नवी मुंबई महानगरपालिका .

विषय : सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर प्राथमिक विभागाकरीता थेट मुलाखतीने (Walk in Selection ) शिक्षक नियुक्ती बाबत.

संदर्भ : जाहीरात क्र.------

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात तासिका तत्वावरील मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक या पदाकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

१) संपूर्ण नांव :---------------------------------------------------------- ----------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) --------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------

३) मोबाईल नंबर : ---------------------------------------------

४) जन्मतारीख : ---------------------------------------------

५) लिंग : स्त्री / पुरुष

६) जात : पोटजात :

७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | डी.एड. | | | | |
| ५ | बी.एड. | | | | |
| ६ | MAHA TET | | | | |
| ७ | CTET | | | | |
| ८ | MS CIT | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते /करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे तासिका तत्वावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

स्थळ :
दिनांक : / /२०२३

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदाराचे नांव)

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.